रायगड जिल्ह्यात वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
नामांकित टाटा कंपनीच्या कॉपर वॉटर, फ्रुट, ज्यूसेस, ग्लुकोज ड्रिंक इत्यादी उत्पादना साठी तालुका निहाय वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
-: संपर्क :-
विहा एन्टरप्रायजेस
9004563266
8888570393

दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

दैनिक रायगड नगरी
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Web : www.raigadnagari.com /
Email : raigad.nagari@gmail.com

● वर्ष १७ वे ● अंक १७६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.२६ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## पुण्यात पाकिस्तान झिंदाबादच्या घोषणा देणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पुणे**

**पुण्यात पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया संघटनेच्या समर्थकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवारी आंदोलन केले होते. यावेळी 'पाकिस्तान झिंदाबाद' घोषणा दिल्याचे व्हिडिओ व्हायरल झाले. 'पाकिस्तान झिंदाबाद' अशा घोषणा दिल्या का, याचा तपास करण्यात येणार असून, बेकायदेशीर जमाव जमविल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. (पीएफआय) च्या कार्यकर्त्यांनी जर पाकिस्तान जिंदाबाद अशी घोषणा केली असेल, तर त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा असे आदेश पुणे पोलीस आयुक्तांना देण्यात आले असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती.**



सोशल मीडिया मधून जे व्हिडिओ उपलब्ध आहेत. ते एकत्र करून आम्ही त्याचे फॉरेन्सिक करणार आहोत. बंडगार्डन पोलिस ठाण्याच्या हद्दीत जी घटना घडली त्याबद्दल पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोशल मीडिया वरुन जे काही व्हिडिओ आहेत ते तपासातून निष्पन्न होत आहेत. त्या अनुषंगाने या गुन्ह्याचा सखोल तपास सुरू आहे. ज्या गोष्टी तपासात निष्पन्न होतील जे काही कलम असतील ते आम्ही ॲड करणार आहोत. पोलिसांची कडक भूमिका आहे जे लोक निष्पन्न होतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

अखेर पाकिस्तान जिंदाबाद व्हिडिओ प्रकरणात पुणे पोलिसांकडून देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानंतर गुन्हा दाखल झाला आहे. बंडगार्डन पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात हे नवीन कलम ॲड करण्यात आले आहेत. राष्ट्रीय तपास संस्थेकडून (एनआयए) देशभरात पीएफआय विरोधात कारवाई करत विविध ठिकाणी छापे टाकले आहेत.

या कारवाईचे पडसाद पुण्यात उमटले. पुण्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पीएफआयच्या काही कार्यकर्त्यांनी कारवाई विरोधात घोषणाबाजी केली होती.

## वेदांतानंतर आणखी एक प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेला : आ.आदित्य ठाकरे

### पुढचे आंदोलन संभाजीनगरमध्ये

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेना नेते आणि युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी आणखी एक प्रकल्प राज्याबाहेर गेल्याचा आरोप शिंदे फडणवीससरकारवर केला आहे. औरंगाबाद येथे प्रस्तावित असणारा प्रकल्प राज्याबाहेर गेल्याचा आरोप आदित्य ठाकरेंनी केला आहे. वेदांता-फॉक्सकॉन आणि बल्क ड्रग पार्क या दोन प्रकल्पांपाठोपाठ आता महाराष्ट्राला मेडिसीन डिव्हाइस पार्क योजनेला देखील मुकावे लागले आहे. उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा व कुशल मनुष्यबळ असताना महाराष्ट्रापासून आणखी एक प्रकल्प हिरावून घेण्यात आला आहे. याबद्दल सत्ताधाऱ्यांना माहिती आहे का? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी केला.



वेदांता फॉक्सकॉन प्रकल्प तळेगावातून निघून गेला. आदित्य ठाकरेंनी ऑरिक सिटीतील प्रकल्प देखील राज्याबाहेर गेला आहे. मेडिसीन डिव्हाइस पार्क राज्याबाहेर गेला आहे, राज्य सरकारला याची माहिती आहे का? असा सवाल आदित्य ठाकरेंनी केला. मेडिसीन डिव्हाइस पार्क इतर राज्यात गेलेला आहे. त्या प्रकल्पांसाठी अनुदान देखील जारी करण्यात आलं आहे. राज्य सरकारनं या प्रकल्पाबद्दल माहिती देखील राज्यातील तरुणांना दिलेली नाही, असं आदित्य ठाकरे म्हणाले. आदित्य ठाकरे यांनी बिडकीनमध्ये होणारा मेडिकल डिव्हाइस पार्क राज्याबाहेर गेल्याच्या विरोधात पुढचं जनआक्रोश आंदोलन संभाजीनगरमध्ये करणार असल्याचं म्हटलं.

## विना परवाना खैराची वाहतूक करणारा टेम्पो रोहा वनविभागाच्या पथकाने पकडला

### ४ लाख ८ हजारांचा मुद्देमाल जप्त, दोघांविरूद्ध गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । धाटाव**

मुंबई - गोवा महामार्गावरील खांब गाव-ानजीक खैर जातीच्या लाकडाची विनापरवाना वाहतूक करणारा टेम्पो वनविभागाच्या पथकाने पकडला. यामधे ४ लाख ८ हजार २२५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून याप्रकरणी दोघांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपवनसंरक्षक रोहा व सहाय्यक वनसंरक्षक रोहा विश्वजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी रोहा मनोज वाघमारे व वनपाल राजेंद्र गायकवाड, वनरक्षक एस.डी. देवकांबळे, एस. एस.भगत, एस. एन.शिद, एस.एम. मुळे, अंगद भोसले, मंगेश पव्हरे, तेजस नरे, योगेश देशमुख, पोपट करांडे, अजिंक्य कदम यांनी २४ सप्टेंबर रोजी पहाटे २ वाजता मिळालेल्या गुप्त बातमी वरून मुंबई - गोवा राज्यमार्ग क्र.६६ वर खांब गावानजिक महेंद्रा टेम्पो क्रमांक एम एच/०६/बी डब्ल्यू/५५७१ या वाहनाची तपासणी केली.



दरम्यान वाहनात खैर सोलीव नग ४८ घ.मी.०.५५८ किंमत ८२५५/- रुपये व वाहन क्रमांक एम एच/०६/बी डब्ल्यू/५५७१ अंदाजे किंमत ४ लाख विनापरवाना वाहतूक करीत असताना आढळून आला. सदर वाहनावर भारतीय वनअधिनियम १९२७ अंतर्गत गुन्हा दाखल करून वाहन व खैर नग असा एकूण एकंदर ४,०८,२५५/- रुपये इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर गुन्हे प्रकरणी डिमाजी पवार रा. चिंचवली व अनंता वाघमारे रा. पाले यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## १९३० च्या जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांचे स्वातंत्र्यासाठी महत्वाचे योगदान : अनंत गीते

**दै.रायगड नगरी । उरण**

महात्मा गांधीच्या सविनय चळवळीचा एक भाग म्हणून २५ सप्टेंबर १९३० रोजी रायगड जिल्हयातील उरण तालुक्यातील चिरनेर येथे जंगल सत्याग्रह झाला. या सत्याग्रहात ब्रिटीश सरकारने चिरनेर ग्रामस्थांवर, सत्याग्रहीवर अन्याय करीत त्यांच्यावर गोळीबार केला. या गोळीबारात ८ नागरिक हुतात्मे झाले. या हुतात्म्यां मूळेच आज देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांचे महत्वाचे योगदान आहे. असे मत माजी केंद्रीय अवजड मंत्री अनंत गीते यांनी चिरनेर येथे व्यक्त केले.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रायगड जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत चिरनेर यांच्या संयुक्त विद्यमाने चिरनेर येथे श्री गणपती मंदिरासमोरील कै. नाना पाटील सभागृह येथे ऐतिहासिक चिरनेर गावातील जंगल सत्याग्रहाचा ९२ वा स्मृतीदिन .../२



## केळंबादेवीचा महिमा ; दानपेटीची चोरी करणारा चोर गजाआड

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील खरोशी गावाच्या डोंगरावर असलेल्या जागृत अश्या केळंबादेवीच्या मंदिरात चार दिवसांपूर्वी अज्ञात व्यक्तीने दानपेटीची चोरी केल्याची घटना घडली होती. सदर चोर मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला होता. परंतु पेण पोलिसांच्या हाताला चोर काही लागत नव्हता, मात्र जागृत व स्वयंभू असलेल्या केळंबादेवीचा महिमा अफाट असल्याने आणि LCB चे कर्तव्यदक्ष पोलीस हेड कॉन्स्टेबल जितेंद्र चव्हाण यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दानपेटीची चोरी करणाऱ्या



मात्र रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागात सध्या कार्यरत असलेले व पेण तालुक्यातील यापूर्वीचा अनुभव असलेले पोलीस हवालदार जितेंद्र चव्हाण यांना खबऱ्याकडून मिळालेल्या गुप्त माहिती नुसार त्यांनी तपासाची सूत्र आपल्या हातात घेऊन डोंगरद्ऱ्यांमध्ये तपासाचा वेग वाढवून खारपाडा गावच्या हद्दीच्या डोंगरावर असलेल्या खैरासवाडी आदिवासीवाडीतून गुरुनाथ तुकाराम वाघमारे वय ४७ या सराईत चोरास ताब्यात घेतले व पोलिसीखाक्या वापरून अधिक चौकशी केली असता त्याने गुन्हा कबूल करत यापूर्वी सुद्धा दादर सागरी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील खारपाडा गावातील स्वयंभू शिवाई देवीच्या मंदिरात चोरी केल्याचे कबूल केले.

सराईत चोरास ताब्यात घेत अटक करण्यात आली. सदर चोर खैरासवाडी येथील जावई असून एका राजकीय पक्षाचा सक्रिय कार्यकर्ता असल्याची चर्चा आहे.

घटनेची सविस्तर माहिती अशी की, गेल्या चार दिवसांपूर्वी स्वयंभू व जागृत म्हणून ओळख असलेल्या व आई एकविरा देवीची बहीण म्हणून प्रसिद्ध असलेल्या पेण .../२

### मंदिरातील चोर त्या राजकीय पक्षाचा कार्यकर्ता

स्वयंभू व जागृत खरोशी येथील केळंबादेवी आणि खारपाडा येथील शिवाई देवीच्या मंदिरात दानपेटी व इतर साहित्याची चोरी करणारा सराईत चोर हा एका पक्षाचा सक्रिय कार्यकर्ता असल्याची बोंबाबोंब सध्या विरोधकांकडून केली जात आहे. सदर चोर कार्यकर्ता त्या पक्षाच्या नेत्याच्या खांद्याला खांदा लावून अनेक कार्यक्रमांत सक्रिय सहभागी असायचा. चोराला सोडण्यासाठी त्या रात्री सदर नेत्यांकडून पोलीस स्टेशनला फोनावर फोन करून शर्तीचे प्रयत्न ही करण्यात आले होते. मात्र ते जागृत देवीच्या महिमापुढे निष्फळ ठरले.

## पनवेल शहर परिसर राहणार तिसऱ्या डोळ्यांच्या कैदेत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर व परिसरात महत्वाच्या गर्दीच्या ठिकाणी आता तिसऱ्या डोळ्याची नजर रोखून असल्याने आता वेगवेगळ्या प्रकारच्या गुन्हेगारीला लगाम बसणार आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी नुकतीच पनवेल ज्वेलर्स असोसिएशनची बैठक घेतली होती. यावेळी त्यांनी व्यापारी बंधूना पनवेल शहर व परिसरात महत्वाच्या गर्दीच्या ठिकाणी सी. सी कॅमेरे उभारण्या संदर्भात सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला व्यापारी बंधूनी उस्फुर्त प्रतिसाद देत शहरातील मोक्याच्या ठिकाणी कॅमेरे उभारण्याचे ठरविले यासाठी व्यापारी राजेश मेहता, संजय जैन व निरज कोठारी यांनी पुढाकार घेऊन त्या संदर्भात नियोजन केले. शहरातील प्रवेशद्वारे त्यामध्ये भाजी मार्केट, टपाल नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर, कापड बाजार, जोशी आळी, जय भारत नाका परिसर, मोहल्ला परिसर आदींसह अशा विविध ठिकाणी हे कॅमेरे बसण्याचे निश्चित केले. त्या नुसार



३० महत्वाच्या जागा ठरवून तेथे कॅमेरे बसविण्यात आले आ-हेत. यासाठी टेक्नो आय ऑर कॅमेरा ब्रँड दाहून टेक्नॉलॉजीचे नईमुद्दीन शेख (रिंटू) यांनी विशेष सहकार्य करून हे कॅमेरे उभारले आहेत. त्यासाठी पनवेल ज्वेलर्स असोसिएशनला जवळपास पाच लाख रुपयाचा खर्च आता पर्यत आला आहे. या कॅमेरांचा कंट्रोल पनवेल शहर पोलीस यांच्यासह असोसिएशनच्या तिघांकडे राहणार आहे. यामुळे निश्चितच शहरातील गुन्हेगारीला आळा बसणार आहे.

## नवरात्रीनिमित्त जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेची महिलांसाठी विशेष भेट

### नऊ दिवस मोफत थायरॉईड टेस्ट तपासणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवरात्रीनिमित्त विविध मंडळांमार्फत नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात येते. जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या मार्फत यावर्षी श्रीक्षेत्र पंचायतन मंदिर नढाळ, चौक येथे नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी संस्थेच्या माध्यमातून पनवेल, नवीन पनवेल आणि खांदा कॉलनी परिसरातील महिलांसाठी जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था आणि दिपक क्लिनिकल लॅब्रोटरी यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत थायरॉईड टेस्टचे आयोजन २६ सप्टेंबर २०२२ ते ४ ऑक्टोबर २०२२ या दिवसात सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत दिपक क्लिनिकल लॅबोरेटरी, शॉप नंबर ४ वास्तु श्री सोसायटी, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल समोर, पनवेल येथे आयोजित केले आहे.

यावेळी तपासणी करणाऱ्या सर्व महिलांना विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे अध्यक्ष .../२

यावर्षी सुद्धा आमच्या जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून आम्ही महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने नऊ दिवस हा आरोग्य उत्सव साजरा करण्याचे नियोजन माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहोत. सामाजिक क्षेत्रात काम करत असताना ८०% समाजकारण आणि २०% राजकारण या त्यांच्या शिकवणीमुळे आमच्या संस्थेचे सर्व सभासद नेहमीच आरोग्य,शिक्षण आणि रोजगार क्षेत्रात विविध उपक्रम राबवत असतात. हा नवरात्रीचा आरोग्य उत्सव सुद्धा त्याचाच एक भाग आहे:

**प्रितम जनार्दन म्हात्रे, अध्यक्ष जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था-मा. विरोधी पक्षनेते प.म.पा.**

# साथ आणि संवाद

'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' असे साळसूद नाव घेऊन देशविरोधी कारवाया करणाऱ्या कट्टर इस्लामी संघटनेवर देशव्यापी छापे पडावेत, त्याच दिवशी सरसंघचालक मोहन भागवत यांनी राजधानीत एका मशिदीत जाऊन इमामांशी आणि मुस्लिम नागरिकांशी चर्चा करावी आणि नेमक्या त्याच दिवशी 'पॉप्युलर फ्रंट'चे मोठे जाळे असणाऱ्या महाराष्ट्रात मुस्लिमांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचविण्यासाठी राज्य सरकारने अभ्यासगट स्थापन करावा, हा कुणालाही विलक्षण योगायोग वाटेल. तसा तो असला तरी या तीनही घटनांच्या मागे एक निश्चित सूत्र आहे. गरीब, अविकसित मुस्लिम समाजाला संवाद साधून सोबत घ्यायचे आणि त्याचवेळी, दहशती वृत्तीला नेस्तनाबूत करायचे, असे हे सूत्र आहे. ते विचारपूर्वक ठरलेले दिसते. भागवत यांनी मागे राजधानीत जी तीन व्याख्याने दिली; तेव्हापासून या प्रयत्नांना वेग आला आहे. गुरुवारी दिल्लीत कस्तुरबा गांधी मार्गावरील मशिदीत मोहन भागवत 'हिंदू आणि मुस्लिम यांचा डीएनए एकच आहे,' असे म्हणत होते; तेव्हा राष्ट्रीय तपास यंत्रणा म्हणजे एनआयए देशभरात व्यापक कारवाईत शंभराहून अधिक संशयितांना जेरबंद करीत होती. 'पीएफआय'वरील ही कारवाई इतकी मोठी आणि नियोजनपूर्वक झाली आहे की, या संघटनेची पाळेमुळे खणून काढण्याचा निर्धार त्यातून दिसतो. त्याचे स्वागत करायला हवे. अशी कारवाई म्हणजे त्या समाजाच्या विरोधातली कारवाई नसते. मात्र, यापूर्वी अनेकदा अशा संशयितांची धरपकड म्हणजे त्या समाजावरचा हल्ला, असे चित्र निर्माण केले गेले. त्यात अनेकांचा राजकीय स्वार्थही होता. भागवत यांनी साधलेल्या संवादाकडे या दृष्टीनेही पाहायला हवे. इतका विविधतेने नटलेला, अनेक पंथ अनुसरणारा आणि भारतीय संस्कृतीचे विविध आविष्कार दाखविणारा इस्लाम जगाच्या पाठीवर इतरत्र कुठेही नाही. मात्र, इस्लामला मोनोलिथ म्हणजे एकाश्म बनवून टोकेरी, कडवट, असहिष्णू करत नेणे, हाच कडव्या संघटनांचा उद्देश असतो. हिंदूंनाही हा धोका नाही, असे नाही. 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' देशभर हेच करीत होती. कडव्या इस्लामचा पुरस्कार, नामानिराळे राहून हत्या घडवणे आणि दंगलसदृश वातावरण धगधगत ठेवणे, ही कामे फ्रंट करीत होती. पुढच्या काही दशकांत संपूर्ण भारत इस्लामी करण्याचे उद्दिष्ट फ्रंटने समोर ठेवले होते. हे होणे अशक्य आहे, हे सर्वांना माहीत असले तरी अशी वेडगळ ध्येये ठेवली की तरुणांच्या डोक्यात विखार आणि इंधन भरणे सोपे जाते. गेल्या काही महिन्यांमध्ये भारतात 'धर्मद्रोहाचा ठपका ठेवून' थंड डोक्याने ज्या हत्या झाल्या, त्यामागे ही 'मेंदूधुलाई'ची कार्यपद्धती होती. मेंदूचे एकदा असे प्रोग्रामिंग केले की दुसऱ्याला मारणे हे पुण्य वाटते आणि स्वत: त्यात मरणे, ही स्वगप्राप्तीची चावी वाटते या चक्रव्यूहात देशातला मुस्लिम तरुण अपवादानेही सापडायचा नसेल आणि फ्रंटसारख्या संघटनांना अनुकूल भूमी मिळू द्यायची नसेल तर भौतिक विकासाची, उत्तम शिक्षणाची, भारतीय संस्कृतीमधील मूल्यांची जाणीव पेरत राहावे लागेल. मुस्लिम तरुण आणि तरुणींना रोजगार द्यावा लागेल. महाराष्ट्र सरकारने मुंबईतील 'टाटा समाज विज्ञान संस्थे'ची यासाठी केलेली नियुक्ती म्हणूनच महत्त्वाची आहे. यातून एक अभ्यास गट मुस्लिम समाजाच्या सामाजिक तसेच आर्थिक विकासासाठी काय करता येईल, याची शिफारस करेल. राज्यात ५६ छोटी-मोठी मुस्लिमबहुल शहरे आहेत. तेथे व्यवसाय व रोजगार निर्मिती होणे आवश्यक आहे. यात धर्मापेक्षाही बहुसंख्य मुस्लिम समाज हा निष्कांचन, हातावर पोट असणारा आणि शैक्षणिक दृष्ट्या मागे पडलेला आहे, हे समाजवास्तव जास्त महत्त्वाचे आहे. केंद्र सरकारने गुरुवारी अनेक केंद्रीय यंत्रणांना कामाला लावून जी व्यापक कारवाई केली; तिची तयारी अनेक महिने चालू होती. याच काळात महाराष्ट्रात अमरावती व उदयपूर येथे धर्मनिंदेचा ठपका ठेवून भीषण हत्या झाल्या. 'सर तन से जुदा' असे मेसेज तर देशभरात अनेकांना गेले. हा क्षणिक भावनिक उद्रेक नसतो. अशा गुन्ह्यांची कारणे तात्कालिक असली तरी ते करणारे सर्वस्वाचा त्याग करण्यास मनाने कधीचेच तयार असतात. किंबहुना, संधीच पाहात असतात. अशा 'धर्मनिष्ठ' तरुणांचे जाळे देशभरात विणत राहणे, हे फ्रंटचे एक काम होते. ते गेली अनेक वर्षे नेटाने चालू होते. केरळ या एरवी शांत प्रांतामध्ये तीन इस्लामी संघटनांनी एकत्र येऊन ही फ्रंट बांधली आणि देशभरात काम वाढवत नेले. अशा दहशती संघटना आणि सकल मुस्लिम समाज यांच्यात फरक करणे, अस्वस्थ तरुण आणि या संघटनांमधील अंतर वाढवत नेणे आणि खुल्या दिलाने संवादाची दारे उघडी करणे, असे बहुमुखी आव्हान आज उभे आहे. मुस्लिम राष्ट्रीय मंच किंवा इतर संघटनांच्या मदतीने केंद्र सरकार अशी पावले टाकणार असेल तर त्याचे स्वागत करायला हवे.

# गेल इंडिया लिमिटेड कंपनीच्या पेट्रोलियम खनिज पाईपलाईन उपक्रमाला कळंबुसरे येथील शेतकऱ्यांचे प्रचंड विरोध


**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल, पेण व अलिबाग तालुक्यातील गावातील गेल इंडिया लिमिटेड या भारत सरकारच्या उपक्रमातून पेट्रोलियम व खनिज पाईप लाईन कायदा १९६२ मधील तरतुदीनुसार संबंधित गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीमधून जात आहे. सदर कायदयातील कलम ३ पीट कलम १ मधील तरतुदीनुसार नोटीसा कार्यालयामार्फत बाधित शेतक-यांना बजावण्याची कार्यवाही ही चालू करण्यात आली आहे. परंतु गेल इंडिया लिमिटेड कंपनीच्या पेट्रोलियम खनिज पाईप लाईन उपक्रमाला उरण तालुक्यातील कळंबुसरे येथील शेतकऱ्यांचे प्रचंड विरोध आहे. तसे विरोधाचे लेखी अर्ज गेल इंडिया कंपनीच्या सी.बी.डी बेलापूर येथील कार्यालयात शेतकर्यांनी दाखल केले आहेत.

सदर उपक्रमासाठी उरण उसर प्रोपेन पाईपलाईन रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील विविध गावांच्या हद्दीतून ही पाइपलाइन टाकण्यात येत आहे परंतु सदर उपक्रम राबविण्यात आले तर शेतकऱ्यांकडून आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. अतिवृष्टीमुळे,सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे शेतकरी संकटात असताना शेतकर्यांच्या म्हणण्यानुसार सदर मिळकतीतून देखील प्रोपेन वाहून नेणारी पाईपलाईन टाकल्यास शेतकऱ्यांना पिक घेणे अशक्य होऊन शेतकऱ्यांचे उपजिविकेचे साधनच नष्ट होणार आहे. त्याशिवाय भविष्यात सदर मिळकतीत शेतकऱ्यांना कोणताही इतर व्यवसाय,उपक्रम करता येणार नाही. त्याचप्रमाणे सदरच्या मिळकती हया इतर कोणत्याही प्रकल्पाकरीता संपादीत करणे शक्य होणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना सदर मिळकतीचे मोबदल्यात भविष्यात निर्माण होणारे प्रकल्प अथवा इतर उपक्रमातून मिळणारे फायदे यापासून सुध्दा वंचित रहावे लागेल. सदर मिळकतीतून शेतकऱ्यांना होणारे फायदे अस्तित्वात येण्यापूर्वीच नाहीसे होतील. त्यामुळे सदर मिळकतीतून प्रोपेन पाईपलाईन टाकल्यास सदरच्या मिळकती हया नापिक होऊन शेतकऱ्यांचे उपजिविकेचे साधन गेल कंपनी कडुन नष्ट होत असल्याने भविष्यात शेतकऱ्यांवर वायुगळती सारखे प्रकार झाल्यास शेतकऱ्यांच्या जीवीताला धोका निर्माण होणार आहे. याअगोदरही कळंबूसरे गावा लगतचे क्षेत्रामधुन एल पी जी पाईपलाईन गेलेली असल्याने त्यामध्ये बरेच क्षेत्र संपादीत झालेले आहे. सदर संपादीत क्षेत्राची नुकसान भरपाई प्रकल्पग्रस्त शेतक-यांना अदयाप मिळालेली नाही.त्यामुळे होवु घातलेल्या प्रकल्पास शेतकऱ्यांचा सक्त विरोध आहे. सध्या येणा-या पाईपलाईन व्दारे आणखी क्षेत्र नापिक होवुन शेतक-यांस त्यांचे उपजिविकेचे साधन असलेले भाताचे तसेच दुबार पिकाचे उत्पन्न घेता येणार नाही. त्यामुळे शेतक-यांवर भविष्यात उपासमारीची वेळ येणार आहे. तसेच सदर शेतजमीनीतुन पाईपलाईन टाकल्यास आजुबाजूचे क्षेत्र देखील लागवडीयोग्य राहणार नाही. म्हणुन सदर प्रकल्पास आम्हा शेतक-यांचा सक्त विरोध आहे.असे शेतकऱ्यांनी सांगितले. तसे पत्रव्यवहार देखील गेल कंपनीशी करण्यात आले आहे.



# जप्त केलेल्या वाहनांची इंजिन आणि स्पेअर पार्ट पळवले



**दै.रायगड नगरी । पनवेल**

रस्त्यात उभे असलेल्या बेवारस वाहन जप्त करून पनवेल महापालिकेने ते एचओसी कॉलनीच्या पाण्याच्या टाकीजवळ ठेवले होते. परंतु त्या ठिकाणी कोणीच राखणदार नसल्याने इंजिन आणि स्पेअर पार्ट काढून नेण्यात आले आहेत. याचा महापालिकेला थांगपत्ता सुद्धा नसल्याची माहिती पुढे आली आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विशेष करून सिडको वसाहतींचे संख्या सर्वाधिक आहे. या ठिकाणच्या रस्त्यावर अनेक ठिकाणी बेवारस वाहने उभे होते. त्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण होत होता. त्याचबरोबर शहराचे विद्रुपीकरण होत असल्याने संबंधित वाहनांवर स्टिकर लावून ते विहित मुदतीत मध्ये हलवण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. त्यानुसार काही मालकांनी आपली वाहने तेथून हलवली. उर्वरित वाहने पनवेल महानगरपालिकेने टोचन लावून जप्तीची कारवाई केली. त्यामध्ये कार, दुचाकी, टेम्पो, ट्रेलर आणि ट्रक चा समावेश होता. ही वाहने पनवेल येथील एचओसी कॉलनीतील पाण्याच्या टाकी जवळ ठेवण्यात आले. सुरुवातीला महानगरपालिकेकडून येथे सुरक्षारक्षक नेमण्यात आला होता.

कालांतराने या वाहनांचे राखणं बंद झाले. अगदी या संधीचा फायदा घेऊन काही वाहनांचे इंजिन काढून नेण्यात आले आहे. त्याचबरोबर काही वाहनांची स्पेअर पार्ट सुद्धा चोरीला गेल्या आहेत. उरलेले भंगार पण उचलून घेण्यात चोर मागेपुढे पाहणार नाहीत. दरम्यान या वाहनांचा मालक ते नेण्यासाठी महानगरपालिकेकडे आल्यास प्रशासन संबंधिताला काय उत्तर देणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्याचबरोबर अशाप्रकारे राजरोस चोरी होत असेल तर महापालिका नेमके करते तरी काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# नवीन पनवेलच्या काही भागांत अपुरा पाणीपुरवठा ; ॲड. वृषाली वाघमारे यांचे सिडकोला निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल येथील सेक्टर १२, १३ व १८ या विभागात काही दिवसांपासून अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेच्या माजी नगरसेविका ऍड. वृषाली वाघमारे यांनी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखली सिडको कार्यालयात निवेदन दिले आहे.

नवीन पनवेल सेक्टर १२, १३ व १८ या विभागात सिडकोतर्फे पाणीपुरवठा करण्यात येतो. गेल्या काही दिवसांपासून या विभागात अपुरा पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे या विभागातील नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सिडको प्रशासनाने त्वरीत नियमित पाणीपुरवठा करावा व जुन्या पाइपलाइन त्वरित बदलण्यात याव्यात यासाठी माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे यांनी पाणीपुरवठा अधिकारी यांना निवेदन दिले. लवकरच कामाची सुरुवात होईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. यावेळी माजी नगरसेविका सुशीला घरत, माजी नगराध्यक्ष व भाजप शहर उपाध्यक्ष संदीप पाटील, भाजप नेते जगदिश घरत आदी उपस्थित होते.



# मा.आ.मनोहर भोईर यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून धुतुम गावातील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहिर प्रवेश

**दै.रायगड नगरी । उरण**

संपूर्ण रायगड जिल्ह्यात शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे काम जोरात सुरु असून शिवसेना जिल्हाप्रमुख तथा कार्यसम्राट माजी आमदार मनो-हरशेठ भोईर यांनी संपूर्ण मतदारसंघामध्ये विकास कामे असो किंवा मतदारसंघातील नागरीकांना सामाजिक, शैक्षणिक मदतीचा हात असो त्यांच्या या कार्यामुळे त्यांनी संपूर्ण मतदारसंघामध्ये आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. त्यांच्या याच कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून धुतुम गावा-तील बाळाराम अनंत ठाकूर, हेमंत मधुकर ठाकूर आणि संतोष हरी ठाकूर यांनी शिवसेनेत जाहिर प्रवेश केला.माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी त्यांच्या हातात शिवबंधन बांधून व भगवी शाल देऊन त्यांचे शिवसेनेत स्वागत केले.

यावेळी सोबत जासई उपविभागप्रमुख राजन कडू , शिवसेनेचे ग्रा. सदस्य रविनाथ ठाकूर, शिवसेनेचे ग्रा. सदस्या पूजा ठाकूर, शाखा प्रमुख कुंदन पाटील, उपशाखा प्रमुख बंधन ठाकूर उपस्थित होते.




पृष्ठ क्र.१ वरुन...

## १९३० च्या जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांचे स्वातंत्र्यासाठी महत्वाचे योगदान

मोठ्या उत्साहात मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी अनंत गिते बोलत होते.यावेळी अनंत गीते यांनी सांगीतले की १८५७ साली स्वातंत्र्यासाठी पहिले बंड झाले. त्यानंतर १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. १८५७ ते १९४७ या कालावधी दरम्यान उरण तालुक्यातील चिरनेर येथे जंगल सत्याग्रह झाला. याची नोंद इतिहासात आहे.

या सर्वांचे स्मरण सर्वांनी ठेवणे आपले कर्तव्य आहे. या हुतात्म्यांचे देशासाठी खूपच मोलाचे योगदान आहे. असे सांगत जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांचे महत्व अनंत गीते यांनी अधोरेखित केले. चिरनेर जंगल सत्याग्रहातील या शूरवीर हुतात्म्यांना उरण पोलिसांच्या वतीने प्रत्येकी बंदुकांच्या तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते हुतात्मा स्तंभास पुष्पचक्रे वाहण्यात आली. ज्या हुतात्म्यांनी देशासाठी बलिदान दिले. त्या हुतात्म्यांच्या नातेवाईकांचे शाल श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

या २५ सप्टेंबरच्या हुतात्मा दिनी पनवेलचे आ.प्रशांत ठाकूर, उरणचे आ.महेश बालदी, कोकण शिक्षक मतदार संघाचे आ.बाळाराम पाटील, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख बबन पाटील, माजी आ.मनोहर भोईर, प्रशांत पाटील, पी.पी.खारपाटील, उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनिल पाटील, माजी जि.प. सदस्य बाजीराव परदेशी, चिरनेर ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष चिर्लेकर, ग्रामविकास अधिकारी महेश पवार, हुतात्म्यांचे नातेवाईक, शासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्यासह चिरनेर पंक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केळंबादेवीचा महिमा ; दानपेटीची चोरी करणारा चोर गजाआड

तालुक्यातील खरोशी गावातील डोंगरावर विराजमान झालेल्या केळंबादेवीच्या मंदिरातील स्टीलची दानपेटी काही अज्ञात व्यक्तीने चोरली असल्याची घटना घडली होती. नवरात्र उत्सव जवळ आल्याने व आपली श्रद्धास्थान असलेल्या देवीच्या मंदिरात चोरी झाल्याने गावकाऱ्यांमध्ये संतापाची लाट पसरली होती. यादरम्यान मंदिराशेजारी असलेल्या डोंगरावरील वाढलेला गवत व पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे पेण पोलिसांना व पेणच्या डीबी पथकाला चोरा पर्यंत पोहचण्यात व तपासात अपयश येत होते. त्यांनी काही संशयित चोरांना पकडून चौकशीअंती सोडूनही दिले होते. अनेक दिवस मंदिरातील चोरीचा तपास लागत नव्हता.

दोन्ही घटनेचा समांतर तपास करत सदर गुन्हेगाराकडून चोरी केलेले ५९०५ रुपये रोख रक्कम, स्टीलची दानपेटी, पूजेचे तांब्याचे ताट व तांब्या ही सर्व मालमत्ता हस्तगत करण्यात आली असून चोरीत वापरलेले लोखंडी टिकाव व पहार ताब्यात घेण्यात आली आहे. गुन्हेगारावर भादवी कलम ४५७, ३८०, ३७९, ४६१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले असून रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक दयानंद गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली उप निरीक्षक धनाजी साठे, पोलीस हवालदार जितेंद्र चव्हाण, पोलीस नाईक जाधव, खराटे हे अधिक तपास करीत आहेत.

## नवरात्रीनिमित्त जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेची महिलांसाठी विशेष भेट

असलेल्या जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून एक सेवाकार्ड भेट म्हणून देण्यात येणार आहे. त्यामध्ये ५०% टक्यांपर्यंत सवलतीच्या दरात रक्तपासणी, उपजिल्हा रुग्णालयामध्ये दाखल निराधार गरजू रुग्णांना मोफत फळ सेवा, माफक दरात एक्स-रे, O.P.G., E.C.G. सेवा, मोफत E-श्रम कार्ड नोंदणी, विविध शासकीय योजनांचे मार्गदर्शन, ना नफा,ना तोटा तत्त्वावर रुग्णवाहिका सेवा या सेवेचा लाभ महिला आणि त्यांच्या कुटुंबातील कोणीही सदस्य घेऊ शकतात अशी माहिती दिली प्रितम म्हात्रे यांनी दिली. तपासणी करीता व अधिक माहितीसाठी हेल्पलाइन क्रमांक ९३२६०५०५०५ / ८३३४०५०५०५ / ७७६९०५०५०५ / ८५४२०५०५०५ या वर संपर्क साधावा.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे पनवेल, ता.पनवेल येथील, सेक्टर १४ मधील, पीएल- ६ए आर क्षेत्रातील, सदनिका क्र १४ बिल्डिंग नं ५ भुखंड क्र.१/१४ नवीन पनवेल (प) ता.पनवेल जि.रायगड या मिळकतीचे, आमचे अशिलांचे मालकीचे ताबेकवजातील सिडकोने दिलेले दि.१४.१०.१९९४ रोजीचे पजेशन लेटर / तावे पावती आणि दि.२०.०५.१९९४ रोजीचे अलोटमेंट लेटर आमचे अशिलांकडुन, मौजे खांदा कॉलनी, नवी मुंबई परिसरात, दि. ०५.०८.२०२२ रोजी हरवीलेले आहेत. सदरचे कागदपत्रे कोणालाही, कुठेही सापडल्यास, त्यांनी त्वरीत ते आमचे अशिलांचे वतीने माझेकडे जमा करावी अगर माझे अशिल श्री. विनायक रामनाथ पाटील, रुम नं १४, सह्याद्री अपार्टमेंट, सेक्टर १४, पीएल ६ए, बिल्डींग नं. ५, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प) ता. पनवेल जि. रायगड यांचेकडे जमा करावी.

दिनांक : २६.०९.२०२२

सही

**श्री. शैलेश धर्मराज नाईक**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**कार्या: १०४, पहिला मजला, पवन को. ऑप. हौ. सोसायटी, जिल्हा व अति. सत्र न्यायालयाचे समोर, पनवेल- रायगड.**
**मो.नं. ९१६७९८९१९७**


# धरणग्रस्त मेंदडीकोंड करिता स्वतंत्र पाणी पुरवठा योजनेकामी १.१२ कोटीची प्रशासकीय मान्यता

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

खासदार सुनिल तटकरे आणि आमदार आदिती तटकरे यांचे विशेष प्रयत्नाने जलजिवन मिशन योजने अंतर्गत म्हसळा तालुक्यातील गाव वाडी वस्तीसाठी १०० कोटी रुपयांचे निधीची मंजुरी मिळविण्यात यश प्राप्त केले आसुन खासदार तटकरे यांनी मौजे मेंदडीकोंडसाठी स्वतंत्र नळपाणी पुरवठा योजनेला लागलीच मंजुरी मिळवुन देवु अशी घोषणा केली असता मेंदडी धरणाचे जलस्तोत्रामधुन १.१२ कोटी रुपयांची स्वतंत्र पाणी पुरवठा योजनेचे प्रशासकीय मान्यता पत्र ग्रामस्थांकडे सुपुर्द करुन खऱ्या अर्थाने खासदार सुनिल तटकरे यांनी दिलेल्या शब्दाची वचन पूर्ती केली आहे.

जलजिवन मिशन योजने अंतर्गत म्हसळा तालुक्यात जास्तीत जास्त नळ पाणीपुरवठा योजना मंजुर करण्यात यश प्राप्त केले असल्याचे खासदार सुनिल तटकरे यांनी आवर्जुन सांगताना या मोठ्या लोकवस्ती असलेल्या गावांशेजारीच दिघी पोर्ट सारखा प्रोजेक्ट कार्यरत असल्याने येथे पिण्याचे पाण्याची उपलब्धता गरजेची आहे. काही दिवसांत मुळगाव मेंदडी,आदिवासीवाडी आणि पाभरे गावाच्या योजनांची प्रशासकीय मान्यता पत्र देण्यात येईल असा उल्लेख केला.

मौजे सुतारवाडी येथील कार्यालयात शासन मंजुर योजनेचे प्रशासकीय मान्यता पत्र मेंदडीकोंड ग्रामस्थांकडे सुपुर्द केले या वेळी त्यांचे समावेत राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष मधुकर पाटील, विजयराव मोरे, तालुका अध्यक्ष समीर बनकर, जिल्हा सरचिटणीस महादेव पाटील, माजी जीप सदस्य सकपाळ, मेंदडी सरपंच राजश्री कांबळे, उपसरपंच रमेश चीपुळकर, पक्ष संघटक जमीर नजीर, लहूशेट म्हात्रे, गाव अध्यक्ष लक्ष्मण धुमाळ, मधुकर कांबळे, कृष्णा धुमाळ, चंद्रकांत धुमाळ, दिलीप कांबळे, कृष्णा कांबळे, गोवर्धन काणेकर, रविंद्र काणेकर, धर्मा बुधे, राजेश कांबळे, प्रितेश कांबळे, नारायण कांबळे, संतोष शेवाळे, मोरेश्वर पाटील, मधुकर पाटील, चंद्रकांत भगत, अनंत भगत, विठ्ल धुमाळ, कानु कांबळे, जगन कांबळे आदि मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# हाकेला धावणारी नवसाला पावणारी केळवणे गावची गावदेवी भवानी माता

केळवणे गावातील गावदेवी भवानी मातेचे मंदिर प्रसिद्ध असून ते अति प्राचीन व जागृत देवस्थान आहे. विशेष म्हणजे चैत्र पौर्णिमेचा उत्सव जो हनुमान जयंती व देवीचा विशाल वनभोजन एकाच दिवशी आणि नवरात्र मोठ्या श्रद्धा भक्तीने साजरी होते. आई भवानी म्हणजे मातेचे सौम्य रूप, हिंदूंची प्रमुख देवता. देवी म्हणजे शक्ती तिची तुलना साक्षात पर्–ब्रम्हाशी केली जाते. देवीला आदिशक्ति, प्रधान प्रकृति, गुणवंतीमाया, बुद्धीतत्वाची जननी तसेच विकार रहित समजतात. अहंकार व अज्ञानरूपी राक्षसांपासून रक्षण करणारी कल्याणकारी व शांती समृद्धी तसेच धर्मावर आघात करणाऱ्या राक्षसी शक्तीचा नाश करणारी देवी समजतात.

एका बाजूला डोंगराळ जंगली भाग तर एका बाजूस खाडी व समुद्र किनारा असलेलं सुख–समृद्धीने नटलेलं गाव म्हणजे केळवणे. आज १५००० च्या पार लोकवस्ती असलेले गाव एके काळी काही मोजक्या घरांचे खेडेगाव (आताची जुनी आळी) होते . गावाच्या आग्नेय बाजूला पहिली टेकडी म्हणजे केळवणे पाडा, तर उत्तरेस उसरण भाग जेथे देवीचे मंदिर आहे तेथे काही तुरळक घरे होती . तेथूनच उत्तरेकडे सुरू होणारे दाट जंगल. आज जे देवीचे मंदिर आहे तेथे मंदिर किंवा देवी नव्हती. देवीचे मुळ स्थान वर डोंगरावर होते, जो घनदाट वृक्षानी आच्छादलेला पण आज झाडे नसल्यामुळे त्याला

जंगली हिंस श्वापदे यांच्या होणाऱ्या त्रासाला कंटाळून उसरण भागातील लोक हळूहळू जुनीआळी ,पाडा यांच्या अवती भोवती राहू लागली, जंगली प्राण्यांच्या भीतीने उत्तरेस कोणी जास्त फिरकतही नव्हते. देवीच्या डोंगरावर जाणे तर शक्यच नव्हते. भक्तांना खूप वाटायचे देवीचं दर्शन घ्यावं तिची पुजा करावी, खणा–नारळाने ओटी भरावी; पण हे शक्य नव्हते. भक्तांची तळमळ आई भवानीने ओळखली आणि चमत्कार झाला. उसरण भागात गेलेल्या गुराख्यांना तेथे देवीच्या मूर्ती दिसल्या. त्यांनी ही गोष्ट गावकऱ्यांना सांगितली. त्यावेळच्या पाटलांनी ह्या देव्या डोंगरावरच्या असल्याचे स्पष्ट केले व त्यानंतर तेथे गावकऱ्यांनी छोटेसे कौलारू मंदिर बांधले व देवीची नियमित पुजा–आरती होऊ लागली. देवीचं येथे येणे तिचेच नियोजन असावे कारण येणाऱ्या संकटांची तिला कल्पना होती. शेवटी ती जग्दजननी, आपल्या मुलांची चिंता तिला होती .

१९४० साली गावात कॉलरा रोगाच्या साथीने ५० ते ६० लोक मेले. रोज स्मशानभुमी पेटलेलीच असे. काही काही लोकांना तर मातीतच पुरले जाऊ लागले. प्रत्येक आळीतील लोक बाहेर अंगणात जागुन पहारा देत. कधी कोण मरेल सांगता येत नव्हते. हा प्रकोप दुर व्हावा म्हणून जुन्या आळीत अध्याय चालू केला, तर मधल्या आळीत अक्षय तृतीयेला पुजा व पाठोपाठ वरचीआळीला सुद्धा पुजा सुरू केली. सर्व ग्रामस्थांनी चर्चा करून गावदेवी भवानीला साकडे घातले. त्यावेळी गावचे प्रमुख पाटील होते, नामदेव नाना पाटील . त्यांच्या मार्गदर्शनात देवीचा मानपान करून पडी भरून गावाच्या दक्षिणेस कागणीचा कोठा ज्याला गर्गा बोलत तेथे नारायण महादु पाटील यांनी नेली. त्यांच्या बरोबर त्या वेळचे पाटील खंड्य कमळ्या व पूर्ण गाव होता.



तो मान दिल्यानंतर आश्चर्याची गोष्ट म्हणजे एकही माणूस दगावला नाही. दुसरी घटना होती १९४६ ला गावाच्या माळरान भागात वाघाने थैमान घातले होते ,भीतीने लोकांना बाहेर निघणे नकोसे झाले होते ,पण त्याचा प्रतिकार करायची कोणाची हिम्मत होत नव्हती , अश्यात पश्चिमेकडे टेपावर वाघ आल्याचे कळाले. काही तरूणांनी देवीचा आशीर्वादरुपी भंडारा घेऊन वाघाला मारायला गेले. जणू त्यांना आईभवानीची शक्तीच मिळाली. त्या वेळी गणपत उंदऱ्या कोळी यांनी पहिला भाला मारून वाघाला जेरबंद केले व नंतर सर्वांनी मिळून वाघाला मारले व गावाचे संकट भवानीमातेच्या कृपेने दूर झाले. तेव्हापासून गणपत कोळी व त्यांच्या कुटुंबाला वाघमारे संबोधु लागले.

देवीच्या चमत्कारिक चर्चे मुले गावाची कीर्ती पंचक्रोशीत पसरू लागली. ११ गावांतील न्याय निवडा मुख्य गाव म्हणून केळवणे येथे होऊ लागला व पुढे १९५२ ला गावात ग्रामपंचायतेची स्थापना झाली

सर्व सुरळीत असताना अचानक अकल्पित घडले....मंगळवार सन १९५६ वेळ दुपार तीन ची , बाब्या हिरु शेडगे व पत्नी रामीबाई उसरण भागात आपल्या शेतावर जात असताना एक आर्त किंकाळी कानावर आली. कुठून आवाज येतोय म्हणून बघताच चार–पाच मुले पळून जात होती. थोडे पुढे देवळाच्या मागे रांजणीच्या झाडाखाली येऊन बघताच दोघेही सुन्न झाली. रामीबाईने तर धावा–धावा म्हणून ओरडायला सुरूवात केली. रांजणीच्या झाडावरून एक सतरा –अठरा वर्षाचा तरुण खाली पडून , मान वाकडी झालेली ,डोके फुटून रक्त वाहत होते, कमरेला मार लागुन कणा वाकलेला आणि एक पाय दुमडुम तुटलेला ,सुन्न शरीर फक्त हाताची बोटे थरथरत होती. बाब्या शेडगेने परिस्थितीचे गांभीर्य पाहता गावात धुम ठोकली. काही वेळात ओळख पटताच गावातुन लाकडी खाट आणून त्यावर त्याच्या घरी नेले. हा तरूण म्हणजे तीन महिन्यापूर्वी ठकुबाई या चौदा वर्षीय मुलीसोबत लग्न झालेला तरूण म्हणजे हिराजी शंकर शिवकर. त्यावेळी लग्न लहान वयात होत असत. ठकुबाईने त्यावेळी देवीला नवस केला,आई भवानीमाते माझ्या कुंकवाच रक्षण कर , जीव वाचवलास तर तुझ्या मंदिराच्या छायेत नऊ दिवस राहीन . ही परीक्षा होती सौभाग्यवतीच्या भक्तीची आणि देवीच्या शक्तीची,अखेर आईभवानीने चमत्कार केला. पिरकोनचे मारुती परदेशी वैद्य यांच्या औषधीला,चिरनेरच्या रघुनाथ कराडी यांच्या लाकडाच्या चिंबानी हाडे जोडण्याला व बेड्यावरील लक्षाबुवांच्या मालिशला देवी मुळे यश आले.नवऱ्याचे प्राण वाचले म्हणून ठकुबाईनं ठरल्याप्रमाणे नऊ दिवस देवीच्या देवळात जोडीनं खोड्या–बेऱ्या (चाफ्याच्या लाकडाच्या रिंगणा) कैद्यांप्रणाणे घालुन नवस फेडला. आता सर्वत्र देवीची कीर्ती पसरू लागली. मुलबाळ होत नाही ,असाध्य रोग रोग बरा होत नाही, संकटसमयी कोणताही मार्ग सापडत नाही त्या वेळी फक्त आई गावदेवी भवानी माते वाचव असे मुखातून शब्द नक्कीच येतात. गावोगावचे लोक दर्शनासाठी येतात, आपले गाऱ्हाणे देवीला सांगून नवस बोलतात आणि आपल्या सवडीने देवळात बसून मानपान देऊन पूर्ण करतात. पंचक्रोषीतील हे एकमेव मंदिर असेल जेथे नऊ दिवसांचा हा नवस फेडणाऱ्यांची संख्या सर्वात जास्त असते. पूर्ण मंदिर,आवार व परिसरातील जागा भरलेलीच असते. केळवणे गावचे आधीचे ब्राम्हण शांताराम भटजी नंतर त्यांचा मुलगा नरसु व पुढे बाळकृष्ण नातू व त्यांचा मुलगा शशिकांत यांनीच मंदिरावर ट्रस्टची स्थापना केली. शशिकांत यांच्या निधनानंतरही केळवणे ग्रामस्तमंडळ व गावकरी अगदी यथाशक्ति व्यवस्थितपणे देवी व तिचे उत्सव कार्य करत आहेत.

गेल्या काही वर्षापूर्वी हे जागृत आणि पुरातन मंदिरात खूप बदल झाला आहे. नव्यानं स्थापन झालेल्या मंदिर कमेटीचे अध्यक्ष रा.जि.प.सदस्य श्री .ज्ञानेश्वर दशरथ घरत यांच्या अथक प्रयत्नाने छोट्याशा मंदिराचे आता सुशोभित, विस्तारीत आणि भव्यदिव्य स्वरूपात रूपांतर झाले आहे. आता मंदिरात नेहमीच होम–पुजन–हवन व इतर अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम नेहमी मोठ्या भक्ती आणि उत्साहाने होतात.

## संक्षिप्त...

### अलिबागमध्ये एडस रोगाबाबत मार्गदर्शन शिबिर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

अलिबाग येथील जिल्हा पोस्ट ऑफिस कार्यालय व जिल्हा रुग्णालयातील आयसिटीसी ०१, ०२ विभाग, व जिल्हा क्षयरोग केंद्र अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या साठी एच.आय. व्ही. अर्थात एड्स रोगाबाबत मार्गदर्शन व तपासणी, ब्लड प्रेशर तपासणी, क्षयरोग मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते.

या प्रसंगी येथील जिल्हा पोस्ट ऑफिस अधिक्षक डॉ. संजय लिये , समुपदेशक सचिन जाधव, कल्पना गाडे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ सुजाता तुळपुळे,अमित सोनवणे, क्षय रोग विभागाचे कीर्तिकांत पाटील, विशाल माळी तसेच आरोग्य समुदाय अधिकारी (उ.कज.) वासुदेव घुटे (सारळ) व पोस्टातील सर्व अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. यावेळी येथे जमलेल्या उपस्थितांना समुपदेशक कल्पना गाडे यांनी एच आय व्ही एड्स बद्दल माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी ४५ जणांची एच. आय. व्ही.(एड्स)रोगाबाबतची तपासणी करण्यात आली.

### म्हसळा येथे राष्ट्रीय सेवा योजना दिवस मोठ्या उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

२४ सप्टेंबर म्हणजे राष्ट्रीय सेवा योजनाचा जन्म दिवस, शिक्षणासोबत समाजसेवा आणि समाजसेवेतून शिक्षण असे उद्दिष्ट घेवून तत्कालीन शिक्षण मंत्री व्ही. के. आर. व्ही. राव यांच्या संकल्पनेतून २४ सप्टेंबर १९६९ मध्ये अस्तित्वात आलेल्या एन.एस.एसचे आज देशभरात ३८ लाखांहून अधिक स्वयंसेवक आहे. अनेक विद्यार्थ्यांचे जीवन एन. एस. एसमुळेच यशस्वी झाले. आणि म्हणूनच एन. एस. एस हा प्रत्येक विद्यार्थ्याचा जिव्हाळ्याचा विषय आहे. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य व कार्यक्रम अध्यक्ष प्रा. दिगंबर टेकळे यांच्या मार्गदर्शनाखाली वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय म्हसळा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना दिवस महाविद्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. एन. एस. एसचे व एन. एस. एस दिनाचे महत्त्व संक्षिप्त परंतू परिपूर्ण असे मार्गदर्शन महाविद्यालयाचे माजी प्रभारी प्राचार्य प्रा. मच्छिंद्र जाधव आणि प्रा. कानिफ भोसले यांनी केले. शेवटी कार्यक्रमाची सांगता विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. अवंतिका बोरकर हीने उपस्थितांचे आभार मानून केली. अशी माहीती एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. सुमित चव्हाण यांनी दिली.

## निवृत्त पोलिस कल्याणकारी संस्था रायगड यांची मुख्यालय येथे सभा संपन्न

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

शुक्रवार दि. २३ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत निवृत्त पोलिस कल्याणकारी संस्था रायगड यांची पोलीस मुख्यालय जंजिरा हॉल येथे संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र कासार यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित करण्यात आली होती. अशी माहीती त्यांनी आमचे जवळ दिली आहे.



या सभेला संस्थेचे उपाध्यक्ष झावरे,उपाध्यक्ष सुरेश म्हात्रे, सचिव दिलीप पाटील, शंकर पाटील, विलास जाधव, रामदास मोरे, गिरीधर पाटील तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील कर्मचारी, कार्यालयीन प्रमुख सौ.पडते, जिल्हा कोषागार अधिकारी इंगळे त्यांचे सहकारी स्वप्निल गोरे, तसेच संपूर्ण जिल्ह्यातून १३० निवृत्त पोलिस अधिकारी, कर्मचारी हजर होते.

याप्रसंगी कर्मचारी यांनी आपापल्या अडीअडचणी मांडल्या. यावेळी सौ.पडते व सहकारी कर्मचारी यांनी तसेच ट्रेझरी विषयी इंगळे व गोरे यांनी मार्गदर्शन करीत अडचणीचे निवारण केले व यापुढेही सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या सभेचे सूत्र संचालन नारायण चांदोरकर यांनी केले. निवृत्त पोलिस कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कासार यांनी अनेक तक्रारींचा पाठपुरावा करून अनेक प्रश्न मार्गी लावल्यामुळेच आणखी नवीन निवृत्त १० सभासद संस्थेत सामील झाले. यानंतर स्नेह भोजन झाले आणि सभेची सांगता झाली असल्याची माहीती त्यांनी दिली आहे.

## पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेसची आढावा बैठक काँग्रेस भवन येथे संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेसची मासिक आढावा बैठक महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या सचिव व पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेसच्या प्रभारी प्राजक्ता कालमनी व पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेस भवन येथे संपन्न झाली. या वेळी माझं गाव माझी शाखा या बाबत आढावा घेतला. त्याचबरोबर पक्ष वाढीबाबत चर्चा करण्यात आली. या वेळी उपाध्यक्ष प्रितेश साहू, राहुल सावंत, महासचिव अलका ठाकूर, शाहिद मुल्ला, प्रमोद पवार, नवीन पनवेल शहराध्यक्ष राहुल जानोरकर, उपाध्यक्ष तुषार पवार, जिल्हा सचिव सत्येंद्र सिंग, कामोठे अध्यक्ष सुरज नरुटे, तळोजा फेज २ अध्यक्ष मोरेश्वर पाटील, प्रभाग १ अध्यक्ष नितेश पाटील, पनवेल अध्यक्ष राकेश जाधव, कळंबोली शहर अध्यक्ष जमीर शहा, अक्षय पाटील, आदित्य गायकवाड, अक्षय कुळे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.


## राजिप प्राथमिक शाळा कोठिंबे शाळेत कशेळे केंद्राची शिक्षण परिषद संपन्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील कशेळे केंद्राची केंद्र स्तरीय शिक्षण परिषद राजिप प्राथमिक शाळा कोठिंबे येथे संपन्न झाली.

शिक्षण परिषेदेचे अध्यक्षस्थान केंद्रप्रमुख अरुण पारधी यानी भूषविले. शिक्षण परिषेदेत दरमहा विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध चर्चा झाली. कोठिंबे शाळेचे पदोन्नती मुख्याध्यापक छगन मेंगाळ यांनी केंद्र कशेळेच्यावतीने शिक्षक दिनानिमित्त यूनिटी वेलफेयर क्लब ऑफ मुंबई या संस्थेकडून आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित झालेल्या केन्द्रप्रमुख अरुण पारधी, पदवीधर विषय शिक्षक विजय जगताप, कुसुम हिंगे, शिवकन्या सदानंदे, पंढरीनाथ पाटील या मान्यवर शिक्षकांचे पुष्पगुच्छ व श्रीफळ देवून स्वागत केले.

केन्द्र प्रमुख अरुण पारधी यांनी प्रस्ताविक केले. विजय जगताप यांनीप्राथमिक शिक्षकांबाबत गेल्या कित्येक दिवसांपासून सोशल मिडियातून अशोभनीय व बिन बुडाचे आरोप केले जात आहेत. त्याबाबत निषेध व्यक्त केला. तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षक कटिबद्ध आहे परंतु एकीकडे शिक्षकाला अनेक अशैक्षणिक कामे देणे व दररोज नवनवीन कागद पत्रे त्वरित पाठविन्या बाबत आदेश येत आहेत. अशा स्थितीत विद्यार्थ्यांची गुणवत्ता कशी वाढेल?असा प्रश्न उपस्थित केला. एवढं करूनही शिक्षक विद्यार्थ्याची गुणवत्ता वाढवत आहे. शिक्षकांना



अपमानित करणे व समाजामाध्यमात ज्या रीतीने शिक्षकाला बदनाम केले जात आहे याचा निषेध करण्यासाठी १ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मोर्चात सर्व शिक्षक बंधु भागिनिनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. शिक्षण परिषदेमध्ये खालील विषयावर चर्चा करण्यासाठी शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन इयत्ता ५वी,(विषय–गणित) जोशी सर, अकादमी कशेळे, ज्ञानरचनावाद, हरिभाऊ दहिफळे,शाळा पिंगळेवाडी. सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन व प्रशासकीय विषय या विषयावर केंद्रप्रमुख अरुण पारधी यांनी मार्गदर्शन केले तर यशोगाथा अनंत खैरे शाळा– सुगवे यांनी सादर केली. सूत्र संचालन बालाजी चौसश्ते यांनी केले तर आभार आशीष उम्बरे यानी मानले.

## स्वच्छ शहर, सुंदर शहराचा नगरसेविका राखी करंबे यांनी घेतला वसा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

देशाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संपूर्ण देशभर स्वच्छ भारत,सुंदर भारत आणि पर्यावरण पूरक उपक्रम राबविले जात आहेत. त्याच अनुषंगाने म्हसळा नगरपंचायत्तीचे मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ म्हसळा, सुंदर म्हसळा अभियान राबविण्यात येत आहे. बहुतांश नगरसेवक आपापल्या वार्डातील स्वच्छता राखण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यातीलच एक भाग म्हणून म्हसळा नगरपंचायतिच्या नवनिर्वाचित नगरसेविका सौ. राखी अजय करंबे यांनी तर स्वच्छतेचा वसाच जणू काही उचलला असून शहराची स्वच्छता राखण्यात दिवसेंदिवस मग्न असल्याच्या दिसतात. त्या केवळ त्यांच्याच वार्डापुरता स्वच्छतेचा विचार करीत नसून जिथे जिथे अस्वच्छता दिसून येते तिथे नगरपंचायतीच्या सफाई कामगारांना विश्वासात घेऊन शहर स्वच्छ ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात.


सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना
### (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरिता संपादित होणाऱ्या खालीलप्रमाणे नमूद जमतीच्या साडेबावीस टक्के योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | युनिट निवाडा क्र. | सर्व्हे हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | भूधारकांचे नाव | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२३ | ११/८<br>३/२<br>५/८<br>६/८<br>९/६ | ०-८-०<br>०-३६-२<br>०-१४-३<br>०-२८-२<br>०-१७-२ | १. श्री. महादेव गोमा पाटील<br>२. श्री. धनराज गोमा पाटील<br>३. निराबाई गजानन पाटील<br>४. जानकुबाई लक्ष्मण पाटील ऊर्फ उर्मिला लक्ष्मण पाटील | १८०० चौ.मी. |

तसेच सदर १८०० चौ.मी. क्षेत्रान्वये दि. २४.१२.२०१४ रोजीच्या संगणकीय सोडतीमध्ये भूखंड क्रमांक १४०, सेक्टर-३ हा भूखंड पुष्पकनगर पारगांवडुंगी येथे वाटपीत करण्यात आलेला आहे.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे |
|---|---|
| १) श्रीमती निराबाई गजानन पाटील<br>२) श्रीमती जानकुबाई लक्ष्मण पाटील उर्फ उर्मिला लक्ष्मण पाटील | १) श्री. महादेव गोमा पाटील<br>२) श्री. धनराज गोमा पाटील |

उपरोक्त दाव्यामधील (हक्कसोड) नूसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीचे भाडेपट्टेदार म्हणून नावांची नोंद घेण्यात येईल.

| | |
|---|---|
| १) श्री. महादेव गोमा पाटील | २) श्री. धनराज गोमा पाटील |

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी करारनामा करण्यात आलेल्या भूखंडामधील हक्क हितसंबंध सोडून दिलेले आहेत त्याची नावे वगळून जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून नोंद घेण्यात येईल. आजच्या तारखेपासून ३० दिवसानंतर कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभांत हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार यापुढे साडेबावीस टक्के योजनेंतर्गत लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ समक्ष न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करुन सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतिसह **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि) तळ मजला, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजनेंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेल्या भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२४८/२०२२-२३


## कोलाड येथे कलगी तुरा नाचाच्या सामन्यास रसिकवर्गाचा भरभरून प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील कोलाड हायस्कूल येथील भव्य प्रांगणावर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस व सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानचे वतीने संपन्न करण्यात आलेल्या कलगी–तुरा नाचाचे सामन्यास रसिक प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद लाभला.या विभागात ही कला आजही जोपासली जात असल्र्याने नाचाचे सामने पाहण्यासाठी कोलाड हायस्कूलचे पटांगण हाऊसफुल्ल झाले होते.



कोकणात विशेषत: रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात या कलेला विशेष असे महत्त्व आहे. तर गणेशोत्सव प्रसंगी व नवरात्रोत्सवात कलगी–तुरा नाचाचे सामने मुद्दामहून ठिकठिकाणी आयोजित केले जातात. सध्याच्या तंत्रज्ञानाचे युगात ही कला लोप पावत चालली असल्याचे एकंदरीत परिस्थितीवरुन दिसून येत आहे. परंतू ही कला म्हणजे कोकणचा ठेवा असून ही कला जपली जावी यासाठी कलगी–तुरा नाच मंडळाचे अध्यक्ष तथा लोकशाहीर सुरेश महाबळे व उपाध्यक्ष रामभाऊ टेंबे तसेच त्यांचे सहकारी अथक परिश्रम घेत असताना दिसत आहेत.

या कलेला प्रोत्साहन मिळावे यासाठी रायगडचे खा.सुनील तटकरे यांनी लक्ष घालावे अशी विनंती केली असता,खा.तटकरे यांनी मृहसळा, श्रीवर्धन, तळा, माणगंव व रोहा येथील सुप्रसिध्द नाच मंडळाच्या भव्य दिव्य स्पर्धा आयोजित करून कलेला एकप्रकारे प्रोत्साहन देण्याचेच. काम केले आहे. तर कोलाड हायस्कूल येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेत एकूण १२ नाच मंडळानी विशेष सहभागी होऊन आपली कला रसिक प्रेक्षकांना दाखविली.

तर सहभागी नाच मंडळांना एक ढोलकी, रोख पाच हजार रुपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी माजी पालकमंत्री आदिती तटकरे, जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मधूकर पाटील, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, विजय मोरे, भाई टक्के, जयवंत मुंडे, नरेंद्र जाधव, किरण मोरे, राकेश शिंदे, संजय मांडलुस्कर, दशरथ साळवी, वसंत भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

# संक्षिप्त...

## म्हसळा शिंपी समाज महीला मंडळ अध्यक्षपदी दिपाली पानसरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

श्री संत नामदेव शिंपी समाज प्रगती महीला मंडळ नवनियुक्त कार्यकारणी निवडीत अध्यक्षपदी दिपाली दिलीप पानसरे यांची तर उपाध्यक्षपदी अमिता रणजित बारटक्के यांची नियुक्ती करण्यात आली. मंडळ कार्यकारणी सदस्य पदी वैशाली करंबे, पुजा करंबे, रोहिणी मिरजकर, आशा पाटुकले, लतिका कळस यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित कार्यकारणीचे महीला मंडळ सदस्या तथा म्हसळा नगर पंचायत नगरसेविका राखी करंबे यांनी पुष्प-गुच्छ देवून अभिनंदन केले. समाजाचे नव निर्वाचित महीला मंडळ निवडीत मावळत्या अध्यक्षा मिनल ढवळे, परिणीती पाटुकले, स्नेहल कळस, सरिता पानसरे, प्राची जावळे, निकिता कळस, भावना बारटक्के यांनी सहभाग घेऊन नवनियुक्त कार्यकारणी मंडळास मनोमन शुभेच्छा दिल्या. म्हसळा नगर पंचायती मध्ये शिंपी समाजाचे दोन नगर सेवक कार्यान्वीत असुन त्यांचे सहकार्याने स्थानीक प्रशासनाकडे शिंपी समाजाचे विकासाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी महीला मंडळ यशस्वी प्रयत्न करेल असे मनोगत नवनियुक्त कार्यकारणी मंडळाने मनोगत व्यक्त करताना सांगीतले.

## वाणदे शाळेत सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती व हस्ताक्षर स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या मुरुड तालुक्यातील वाणदे येथील महादेव हशा दिवेकर विद्यामंदिरात शासनाच्या वतीने इ.५वी.ते इ.७वी.तील आदिवासी विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती रुपये १५००/- चा धनादेश (चेक) देऊन गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा. या उद्देशाने लोकनेते ड. दत्ता पाटील ( दादा ) यांच्या पुण्यतिथी निमित्ताने इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या वर्गाची हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली होती.शाळेतील इयत्ता ५ वी ते १० वी. च्या वर्गातील १ ते ३ क्रमांक मिळविलेल्या स्पर्धकांना शालेय समितीचे चेअरमन तुकाराम पाटील व प्रभारी मुख्याध्यापक समीर जठारी यांच्या हस्ते रोख रक्कम व पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहा. शिक्षक योगेश भगत यांनी केले.यावेळी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# व्यक्तिमत्व विकासात गुरुचे स्थान सर्वोच्च : अदिती तटकरे

## अविष्कार फाऊंडेशन आयोजित गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळा

**दै.रायगड नगरी । दिघी**

प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासात शिक्षकांची भूमिका निर्णायक असते. क्षेत्र कोणतेही असो गुरु विना विकास शक्य नाही. व्यक्तिमत्व विकासात गुरुचे स्थान सर्वोच्च आहे असे प्रतिपादन श्रीवर्धनच्या आमदार आदिती तटकरे यांनी केले आहे.




श्रीवर्धन शहरातील कुलकर्णी सभागृहात आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. सदर पुरस्काराचे वितरण आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. आपल्या मनोगतात आदिती तटकरे म्हणाल्या आपल्या आयुष्यातील जडणघडणीमध्ये गुरुची महत्त्वाची भूमिका आहे. आज अविष्कार फाउंडेशन च्या वतीने राज्यभरातील कर्तुत्ववान शिक्षकांचा सन्मान केला जात आहे. मी जिल्हा परिषद चे अध्यक्ष असताना जिल्हा परिषदेच्या विविध भागातील शिक्षकांच्या समस्या जाणून घेतल्या. दुर्गम आणि शहरी या दोन्ही विभागांमध्ये ज्ञानदानाचे काम समर्पकपणे शिक्षक वर्ग करत असतात. शिक्षकांच्या अनेक समस्यांचे निराकरण करण्याचे काम यापूर्वी मी केले आहे. भविष्यात सुद्धा शिक्षकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. आयुष्यातील काही कालावधी मी शिक्षक म्हणून शिकवण्याचं काम केलेलं आहे. त्याचा मला निश्चितच सार्थ अभिमान आहे.

आपल्या सर्वांच्या आयुष्यावर शिक्षकाने केलेल्या संस्काराचा मोठा प्रभाव असतो. यश आणि अपयश दोन्हींना सामोरे जाण्याची ताकद शिक्षकाकडून मिळालेल्या संस्कारद्वारे आपणास मिळते. समाजातील प्रत्येक घटक शिक्षकांप्रती ऋण व्यक्त करतो. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याच्या जडणघडणीचे दायित्व शिक्षकावर सोपवलेले असते. असे तटकरे यांनी सांगितले.

आदिती तटकरे यांनी पुरस्कार प्राप्त सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. सदर सोहळ्यासाठी राज्यभरातील विविध जिल्ह्यातील शिक्षक संजय पवार, राजेश सुर्वे, संतोष भोसले, संदीप नागे, राज आंबटकर, शंकर शिंदे यांसोबत पुरस्कार प्राप्त महाराष्ट्रातील विविध शिक्षक आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

# वेणगाव येथील जागृत श्री महालक्ष्मी देवी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत रेल्वे स्थानकापासुन पुर्वेकडे चार किलोमीटर अंतरावर कर्जत - जांभिवली रस्त्यावर वेणगाव येथे श्री महालक्ष्मी स्वयंभू देवस्थान आहे, हे महालक्ष्मी देवस्थान अति प्राचीन असुन पंचक्रोशीत तसेच बाहेरही प्रसिध्द असे जागृत देवस्थान आहे.



१८५७ च्या आंदोलनातील पुढारी नानासाहेब पेशव्यांचा जन्म या वेणगाव गावी झाला, नवरात्रीला श्री महालक्ष्मी मंदीरात उत्सव व यात्रा भरत असल्याचा उल्लेख महाराष्ट्र राज्य गॅझेटियर रायगड जिल्ह्यांतील प्रेक्षणीय स्थळ पान. नं. ८६४ मध्ये आहे, या देवास्थानची आख्यायिका अशी सांगितली जाते की, कोल्हपुरची श्री महालक्ष्मी आपल्या बहिणीस भेटावयास जाताना तिच्या रथाचे चाक घसरले व थोड्याच अंतरावर रथाच्या एका घोड्याचा पाय घसरला, श्री महालक्ष्मी तेथेच वास करुन राहिली, ते ठिकाण म्हणजेच सद्यस्थितीतील असलेले श्री महालक्ष्मी मंदीर होय, देवीच्या रथाचे चाक व घोड्याचा पाय जेथे घसरला ती ठिक़ाणे मंदीर परिसरात आजही पहावयास मिळतात.

सुमारे दोनशे वर्षापुर्वी वेणगाव येथील एक गावक-याच्या स्वप्नात देवीने येऊन येथे वास करित असल्याचा दृष्टांत दिला व गावक-यांनी तिथे निवारा बांधला व श्री देवीचे दैनंदिन पुजा-अर्चा सांजवात सुरु केली व ती आजतागायत अव्याहतपणे सुरु आहे, काळाच्या ओघात मंदीर जिर्ण झाले होते तसेच भाविकांच्या वाढत्या गर्दीमुळे होणारी गैरसोय टाळण्यासाठी या श्रध्दास्थानाचा जीर्णोध्दार १९९७ साली विश्वस्त समितीने केला, देवीचे सथान स्वयंभू असुन तिच्या नवसाची प्रचिती अनेक भक्तांना आलेली आहे, यामुळे कर्जत पंचक्रोशी तसेच लांब लांबुन भक्तगण श्री महालक्ष्मीच्या दर्शनास अखंड येत असतात, हे मंदीर अतिशय रम्य अश्या ठिक़ाणी आहे, आजुबाजुला डोंगर, शेती, वनश्री असल्याने या परिसरात आल्यावर खुपच प्रसन्न वाटते.

ट्रस्ट तर्फे त्रिपुरा पोर्णिमा, हनुमान जयंती, होळी पोर्णिमा, सीमोल्लंघन व माघी गणेशोत्सव आदी कार्यक्रम केले जातात, नवरात्रीत नऊ दिवस दर्शनासाठी गर्दी होते, नऊ दिवस येथे पुजा सप्तशक्ती पाठ, पठण, अभिषेक, भजन-किर्तन असे कार्यक्रम आयोजित केले जातात, घट उत्थापनाचे दिवशी नवचंडी चा होम केला जातो.

> श्री महालक्ष्मी देवी नवसाला पावणारी देवी म्हणून प्रसिध्द आहे. आमच्या या परिसरातील बाहेरगावी असलेले ग्रामस्थ या नऊ दिवसात येऊन आवर्जुन दर्शन घेतात. अगदी दररोज चार - पाच किलोमीटर अनवाणी पायांनी येणा-यांची संख्या सुध्दा मोठी आहे. आम्ही समितीच्या वतीने वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करीत असतो.
>
> **रंजन शिवराम दातार-(अध्यक्ष)**

# नवरात्री उत्सव शांततेत साजरा करा : संजय पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली शहर व परिसरात होणारा नवरात्र-ोत्सव शांततेत व निर्भय वातावरणात साजरा करण्याचे आवाहन पोलिस वरिष्ठ निरीक्षक संजय पाटील यांनी केले. नवरात्रोत्सव मंडळ, शांतता कमिटी, मोहल्ला कमिटी, पो-लीस मित्र, महिला दक्षता, जेष्ठ नागरिक, प्रतिष्ठित नागरिक यांची सुधागड स्कूल, सेक्टर १ ई येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



शहरातील पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनिक नवरात्र उत्सव साजरा होणार आहे. मंदिरामध्ये घटस्थापना आणि सार्वजनिक, खासगी ठिकाणी देवीचा उत्सवही होत आहे. दोन वर्षानंतर मुक्त निर्बंधात नवरात्री उत्सव होत आहे. त्यामुळे देवी भक्तांचा उत्साह शिगेला गेला आहे. तेव्हा हा उत्सव शांततेत साजरा करा. पोलीस शांतता, कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यासाठी जनतेनेही सहकार्य करावे असे आवाहन संजय पाटील यांनी केले. उत्सवा दरम्यान शांतता राहणेबाबत, तसेच विविध सामाजिक उपक्रम राबवण्याबाबत सूचना करण्यात आल्या. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने दे-वीची मिरवणूक, आगमन होते. या ठिकाणचे रस्ते सुस्थितीत असावेत. विद्युत खंडित होणार नाही, याची खबरदारी घ्यावी, अशी मागणी मंडळाच्या सदस्यांनी केली. यावेळी सुधागड एज्युकेशन सोसायटीचे प्राचार्य राजेंद्र पालवे, भाजपचे सितेंद्र शर्मा ( सिंतू शर्मा) आदिसह पोलिस अधिकारी, मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये १३५ ते १४० जण उपस्थित होते.

# ब्राह्मण सभेच्या वतीने शालोपयोगी वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ब्राह्मण सभा, नवीन पनवेल या संस्थेच्या वतीने 'नेरे हायस्कूल, भागशाळा, विहिघर' या शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला संस्थेच्या अध्यक्ष दिपाली जोशी, सचीव मंजुषा भावे, खजिनदार वैशाली सरदेशपांडे, सहखजिनदार आरती बोधनकर व सदस्या विनया वाळिंबे आदी महिला सभासद उपस्थित होत्या. या उपक्रमासाठी ब्राह्मण सभेच्या सभासदानी यो-गदान दिले. तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी या कार्यक्रमाचे योग्य नियोजन केले.

ब्राह्मण सभा, नवीन पनवेल ही संस्था शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असून त्यांच्या वतीने वतीने प्रतिवर्षी विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. याबाबत माहिती देताना सचीव मंजुषा भावे यानी सांगितले, समाजातील उपेक्षित, गोरगरीब व गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचून त्याना सहाय्य करण्याचे काम संस्था करत असते. विशेषतः गोरगरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी संस्था प्रयत्नशील आहे.

# श्रीवर्धन मतदारसंघातील आधार जोडणी एक लाखाच्या पार

**दै.रायगड नगरी । दिघी**

मतदार यादी ला आधार जोडणी उपक्रमास श्रीवर्धन मतदारसंघात चांगले यश प्राप्त झाले आहे. श्रीवर्धन प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी दिलेल्या माहितीनुसार २४ सप्टेंबर २०२२ पर्यंत श्रीवर्धन मतदारसंघातील एक लाख व्यक्तींची मतदार यादी ला आधार जोडणी पूर्ण झाली आहे.

श्रीवर्धन मतदारसंघात एकूण दोन लाख ६२ हजार मतदार आहेत. त्यापैकी एक लाख मतदारांचे आधार जोडणी चे काम पूर्णत्वास गेले आहे. अमित शेडगे यांनी सांगितले, रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनानुसार श्रीवर्धन मतदारसंघातील सर्व विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अतिशय नेटाने मतदार यादीत आधार जोडणीचे काम यशस्वी पणे पूर्ण करण्यासाठी अतिशय चांगले प्रयत्न केले आहेत. विशेषता मतदार केंद्रस्तरीय अधिकारी शिक्षकांनी अग्रणी भूमिका बजावलेली आहे. सांघिक व नियोजनबद्ध पद्धतीने सर्वांनी काम केल्यामुळे श्रीवर्धन मतदारसंघात लवकरच आधार जोडणीचे काम पूर्ण करू असा विश्वास अमित शेडगे यांनी व्यक्त केला आहे.

श्रीवर्धन मतदारसंघाचा श्रीवर्धन, म्हसळा, तळा,माणगाव, रोहा असा विस्तार झालेला आहे. मतदार यादीस आधार जोडणी केल्यामुळे कोणत्याही मतदाराला दोन ठिकाणी मतदान करता येणार नाही. आधार जोडणी उपक्रमास मतदारांकडून प्रशासनास चांगले सहकार्य होत आहे.

# जेएनपीएकडून राज्य सरकारला ८१४ हेक्टर मॅन्ग्रोव्ह क्षेत्र राज्य सरकारला सुपूर्द

## पर्यावरण संवर्धनासाठी जेएनपीएची वचनबद्धता

**दै.रायगड नगरी । उरण**

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) कडून राज्य सरकारच्या मँग्रोव्ह सेल यांना ८१४ हेक्टर मॅन्ग्रोव्ह क्षेत्र सुपूर्द करण्यात आले. या वेळी राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ उपस्थित होते.एमआरएसएसीद्वारे आयोजित जीआयएस आधारित मॅन्ग्रोव्हच्या मॅपिंगनुसार पर्यावरण संवर्धनासाठी ८१४ हेक्टर मॅन्ग्रोव्ह क्षेत्र महाराष्ट्र सरकारच्या स्वाधिन केले आहे.



आम्ही नैसर्गिक अधिवासांचा आदर करतो आणि त्यांच्या वनस्पती आणि प्राण्यांचे पालनपोषण करण्यासाठी कार्य करीत आल्याचे जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी म्हटले आहे.ते पुढे म्हणाले की,जेएनपीए शाश्वत विकासासाठी वचनबद्ध आहे आणि बंदर परिसरातील पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी विविध उपक्रम आणि उपाययोजना राबवते. जेएन पोर्टने एक कृती आराखडा तयार केला आहे.याशिवाय बंदरातील सर्व क्रियाकलापांचा समावेश आहे ज्यात कार्गो हाताळणी, साठवण, निर्वासन आणि पर्यावरण संरक्षणाशी संबंधित इतर अनेक क्रियाकलाप समाविष्ट आहेत.

बंदराने पर्यावरण व्यवस्थापन आणि देखरेख योजना देखील तयार आणि लागू केली आहे. काही ग्रीन पोर्ट उपक्रमांमध्ये ग्रीन झोनचा विस्तृत विस्तार, जेएनपीए येथे एलइडी दिवे वापरणे, ई-वाहनांचा वापर, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन इत्यादींचा समावेश आहे. जेएनपीएचे तत्वज्ञान व्यवसायाच्या पलिकडे मूल्य निर्माण करणे आणि व्यवसायाच्या केंद्रस्थानी शाश्वत विकास ठेवणे आणि शाश्वत भविष्य निर्माण करणे आहे. असेही या वेळी उन्मेष वाघ यांनी नमूद केले.

### एल एन टी नागोठणे प्रकल्पाचा नागरिकांच्या जीवाशी खेळ

# चिखल माती खडीवरून पाच मोटरसायकलस्वार कोसळून जखमी

## जलद उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा स्थानिकांचा इशारा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रिलायन्स टाऊनशीप गेटसमोर एल एन टी प्रकल्पाच्या माध्यमातून भर पावसाळ्यात वसाहत निर्माणाचे काम सुरू आहे. सदरचा प्रकल्प हा नागोठणे पोयनाड मार्गावर सुरू असून बांधकामासाठी लागणारी खडी, माती , वाळू , डबर व इतर साहित्याची वाहतूक या मार्गावरून केली जातेय, त्यामुळे या मार्गावर चिखल व वाळू पडलेली असल्याने दिवसेंदिवस अपघाती घटनांत वाढ होताना दिसतेय. गुरुवार ते शनिवार या तीन दिवसात पाच मोटारसायकल स्वार घसरून कोसळून जखमी झाल्याने जखमींचे नातेवाईक व स्थानिक जनतेतून संताप व्यक्त होतोय. एल एन टी नागोठणे प्रकल्पाचा नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असून आज मोटारसायकल स्वार कोसळून जखमी झालेत , भविष्यात मोठे अपघात झाल्यास जीवित हानी होण्याची भीती देखील वर्तवली जातेय. पावसाळ्यात मोटारसायकल स्वारांना येथून प्रवास करताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतोय, येथील कामगारांना ने आन करणाऱ्या बसेस मुख्य मार्गालगत उभ्या केल्या जात आहेत, त्यामुळे आधीच अरुंद असलेला रस्ता , त्यात या उभ्या केलेल्या बसेस या देखील अपघाताला निमंत्रण देत आहेत.

अपघाती घटना वाढत असताना एल एन टी प्रशासन अजून जीवघेण्या अपघाताची प्रतीक्षा करतेय का? असा सवाल जनतेतून उपस्थित केला जातोय, याठिकाणी शनिवारी सकाळी नितीन पाटील व प्रशांत म्हात्रे दोघे मोटारसायकल घसरून पडले व जखमी झाले, जखमींना उपचारासाठी पेण येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान एल एन टी प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर बांधकाम साहित्याची वाहतूक या मार्गावरून होते, त्यामुळे सांडलेल्या मातीचा चिखल , वाळू व खडी अनेकदा रस्त्यावर पडलेली असते, या मार्गावरून बसेस, डंपर , पिकअप या वाहनांची देखील वर्दळ असल्याने चिखल इतरत्र पसरतो, त्यामुळे वारंवार या हद्दीत अपघाती घटना घडत आहेत, सुरवातीच्या पावसात याठिकाणी आपण स्वतः देखील घसरून पडलो होतो, तीन दिवसात पाच जण घसरून पडले आहेत.

या प्रकल्पाद्वारे होत असलेल्या कामात सुरक्षिततेच्या बाबतीत निष्काळजीपणा केला जात असल्याचा गंभीर आरोप करीत यापुढे याठिकाणी कोणती दुर्घटना घडू नये यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अनंत भुरे, दीपक पाटील यांनी केली आहे. तसेच येथील रस्त्यालगत उभ्या केलेल्या बसेस स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करून त्या ठिकाणी उभ्या कराव्यात अशी देखील मागणी केली जातेय. या अपघाती घटनांना संबंधित प्रकल्प जबाबदार असून वेळीच उपाययोजना कराव्यात अन्यथा स्थानिक जनता रस्त्यावर उतरेल असा इशारा देण्यात आलाय.

# सराईत कार टेप चोरी करणाऱ्या चोरट्यास पनवेल शहर पोलिसांनी घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । उरण**

पनवेल शहर परिसरात उभ्या असलेल्या चार चाकी वाहनाच्या गाडीच्या काचा फोडून आतून महागडे कार टेप ची चोरी करणाऱ्या चोरट्यास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे .

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात मालमत्तेचे गुन्हे वाढले असल्याने सदर गुन्हे उघड करणेसाठी पोलीस आयुक्त , पोलीस सह आयुक्त , अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे , यांच्या सुचनेनुसार व पोलिस उप आयुक्त , परि २,सहाय्यक पोलिस आयुक्त , पनवेल विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली प्राप्त सीसीटीव्ही फुटेज च्या आधारे गाडीची काच तोडून कार टेप चोरी करणारा सराईत आरोपीचा पनवेल शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. संजय जोशी (गुन्हे), पोउपनि अभयसिंह शिंदे,पोहवा रविंद्र राऊत,पोना परेश म्हात्रे,पोना महेंद्र वायकर,पोना विनोद देशमुख,पोना रविंद्र पारधी,पोशि विवेक पारासुर,पोशि प्रसाद घरत आदींच्या पथकाने सदर आरोपी नामे जुबेर रईस अहमद व. व. ३२ रा. जीवदानी बिल्डिंग, मुंब्रा पोलिस स्टेशन जवळ, मुंब्रा याचा शोध घेत असताना सदरचा आरोपी हा कळवा परिसरात असल्याची माहिती मिळाल्याने प्राप्त माहितीच्या आधारे पनवेल शहर गुन्हे प्रकटीकरण पथकाने सदर आरोपीला ताब्यात घेतले असता त्याने आता पर्यत शहरातील फिर्यादी जयेश संतोष म्हात्रे, रा टिळक रोड, पनवेल एमटीएनएल रोड परिसरातून कार टेप चोरी केल्याचे कबुल केल्याने चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पुढील तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत .